# शेतातील सौर उर्जेचे पॅनल चोरी करणारा चोरटा आर्वी पोलीसांच्या जाळ्यात

फिर्यादी नामे कैलास मधुकरराव रामटेके, (ग्रामपंचायत बाजरवाडा सरपंच) रा. चोंदी (ब.) यांनी पोलीस स्टेशन आर्वी येथे रिपोर्ट दिला कि, बाजारवाडा गावातील लोकांनी वॉटर कप स्पर्धेमध्ये मिळालेल्या बक्षीसमधुन ग्रामपंचायत बाजारवाडा अंतर्गत येणाऱ्या गावांना पाणीपुरवठा व्यवस्थीत व्हावा याकरीता सार्वजनीक पाणीपुरवठा विहीरीवर सौर उर्जेचे १५ पॅनल लावले होते. दि. १७.११.२०२० ते दि. २७.११.२०२० चे दरम्यान सार्वजनीक पाणीपुरवठी विहीरीवर लावण्यात आलेल्या सौर उर्जेच्या  १५ पॅनल पैकी १ पॅनल कि. २०,००० रु. हे कोणीतरी अज्ञात चोराने चोरुन नेले. अशा फिर्यादीचे तोंडी रिपोर्टवरुन पोलीस स्टेशन आर्वी येथे अप. क्र. ५२५/२०२० कलम ३७९ भादंवि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला होता.

सदर गुन्ह्याचे तपासात मुखबीरकडून खात्रीशीर माहीती मिळाली कि, बाजारवाडा शेत शिवारात एक ईसम संशयीत रित्या फिरत आहे. अशा माहीतीवरुन आरोपी शेख नासीर शेख आशीक, रा. आर्वी यास ताब्यात घेवुन त्यास गुन्ह्यासंबंधाने विचारपुस केली असता त्याने सदर गुन्हा केल्याचे कबुली दिल्याने त्यास गुन्ह्यात अटक करुन त्याचे कडुन गुन्ह्यात चोरीस गेलेली एक सोवा सोलर कंपनीची सौर उर्जेची पॅनल कि. २०,००० रु. असा मुद्देमाल जप्त करून गुन्हा उघड करण्यात आला आहे.

सदर कारवाई मा. पोलीस अधिक्षक श्री. प्रशांत होळकर, मा. उपविभागीय पोलीस अधिकारी तृप्ती जाधव यांचे मार्गदर्शनात मा. पोलीस निरीक्षक श्री. संजय गायकवाड यांचे निर्देशाप्रमाणे गुन्हे शोध पथकातील पोलीस अंमलदार भगवान बावणे, भुषण निघोट, चंद्रशेखर वाढवे, राजु राऊत, मनोज भोमले सर्व नेमणूक पो.स्टे. आर्वी यांनी केली आहे.